स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतर विद्याशाखीय अभ्यास
विद्याशाखेतर्गत शिक्षणशास्त्र विद्यावाचस्पती पदवीच्या अंशत:
पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

श्री. पांचाळ नागोराव गजानन

मार्गदर्शिका

डॉ.रामटेके वनिता देवदास

संशोधन केंद्र.

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष

डिसेंबर -२०२४

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम.

प्रस्तावना :

बारा बलुतेदारामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सुतार समाज होय. पूर्वापार परंपरेपासून ज्या गावात सुतार समाजाची घर नसेल तर त्याला त्याला गाव म्हंटले जात नसे. त्याला वाडी किंवा वस्ती असे म्हणत. या देशात प्रत्येक गावात एक तरी सुताराचे घर असते. सुतार म्हंटले कि आपल्या समोर चित्र उभे राहते ते फर्निचर अथवा लाकडी कोरीव काम अथवा गावातल्या शेतीसाठी लागणारी लाकडाची अवजारे तयार करणारा कारागिर वर्ग. सुतार समाजात आहेर सुतार, पांचाल सुतार, लिंगायत सुतार अश्या काही पोटजाती आहेत. सुतार समाजाचा समावेश प्रामुख्याने इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गात केला जातो.

अगदी वैदिक काळापासून ते आजपर्यंत सुतार व्यवसाय चालू असलेला दिसून येतो. या व्यवसायाला काळानरूप चढउतार आले. स्वातंत्र्यापूर्वी व नंतर सुतार व्यवसायाला भारतीय समाजात अनन्य साधारण महत्व होते. समाजात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. शेतीसाठी लागणारे सर्व अवजारे उदा. वखर, तिफन, बैलगाडी, कोळप, चाडे नळे, जूइ. सुतार बनवीत असत. शेतकऱ्यानी दिलेल्या बलुत्यावर सुतारांचा उदरनिर्वाह चालत असे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती होवून शेतीसाठी लागणारी अवजारे आधुनिक तंत्रावर आधारित बनण्यास सुरुवात झाली. परिणामता: शेतकरी वर्गाने यांचा वापर सुरु केला. त्यामुळे सुतारांचा गावकीचा व्यवसाय बंद पडत गेला. पुढे या कामाचे स्वरूप बदलत गेले घरांची लाकडी दरवाजे, दारे, खिडक्याया वस्तू बनवून सुतार समाज आपला संसार चालवीत होता. कालांतराने लाकडी वस्तू ऐवजी लोखंडी, अल्युमिनिअम, प्लास्टिक सारख्या उत्पादनातूनया वस्तू तयार होवू लागल्या. किंमत कमी व आकर्षकता यामुळे समजाने त्यांचा वापर सुरु केला. आतामात्र सुतार व्यवसाय पूर्णता: नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. सध्या प्लायवूड फर्निचरचे काम चालत आहे परंतु या कामात प्रांतीय कारागीर सहभागी झाल्याने स्थानिक सुतारांना त्यांची स्पर्धा करणेकठीण आहे. त्यामुळे आज एकेकाळी वैभवाच्या शिखरावर पोहचलेला सुतार व्यवसाय संपुष्टात येतो कि काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. कामा अभावी सुतार समाज ग्रामीण भागातून स्थलांतर होवून श्री भागात जावून जमेल ते काम करून पोट भरत आहे. एकंदरीत परिस्थिती पाहता समाज व व्यवसाय या दोघांचेही स्थलांतर झाले आहे.

एकेकाळी सुतार व्यवसायात मग्न असणारा समाज शिक्षणापासून दूर राहिला होता. शिक्षणाची गरज त्यांना वाटत नव्हती. परंतु बदलत्या परिस्थितीने सुतार समाजाला जाग केल. व्यवसायाची सध्यस्थिती पाहता आज शिक्षण हि बाब आवश्यक आहे याची जाणीव समाजालाहोत असल्याचेदिसून येते.याचाच परिणाम म्हणून आज सुतार समाजाने शिक्षणाची कस धरायला सुरुवात केली आहे. मागील काही दशकापासून शासनाने शिक्षणाचा प्रचार व प्रसार सर्वासाठी व्हावा म्हणून अनेक प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये सर्व शिक्षा अभियान असेल किंवा शिक्षणाच्या हक्काचा कायदा असेल यातून सुतार समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहचण्यास मदत झाली. सुतार समाज सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास असल्याकारणाने समाजातील शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विध्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कौटुंबिक परिस्थिती शिक्षणाला फारसी अनुकूल नसते. गरिबीमुळे हा समाज मुले - मुली हुशार असताना देखील शिकवू शकत नाहीत. अशी अवस्था असताना देखील सुतार समाजातून ज्यांना शिक्षणाची खूप आवड होती त्यांनी आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करून व ज्यांची शिकण्याची ऐपत होती घरातील वातावरण अनुकूल होते अशा दोन्ही प्रकारच्या कुटुंबातून शिक्षण घेवून नवीन पिढी शिक्षक, पोलीस, डॉक्टर, वकील, इंजीनीयर, जिल्हाधिकारी, न्यायाधीश, शासकीय अधिकारी या सारख्या पदावर आरूढ होताना दिसत आहे. हा सर्वबदल सुतार समाजात शिक्षणामुळे झाला आहे. अनेक शिक्षित तरुणांनी पारंपारिक व्यवसाय सोडून विविध वेगळ्या कौशल्यावर आधारित व्यवसाय करण्याकडे आपला कल वळवला आहे. हा सर्व परिणाम सुतार समाजावर शिक्षणाचा झालेला दिसून येतो.

शैक्षणिक विकासाच्या प्रवाहातआज सुतार समाज येत आहे. अर्थात यासाठी अनेक अडचणी येतात हि वस्तुस्थिती आहे. शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या समाजाचे प्रमाण पण अत्यल्प आहे. त्यामुळे सर्व समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची गरज आहे. यासाठी शासनाकडून व सामाजिक सेवाभावी संस्थाकडून गांभीर्याने विचारमंथन करण्याची गरज आहे.

आजची सुतार समाजाची शैक्षणिक परिस्थिती पाहता समजाचा जो काही शैक्षणिक विकास आज झाला आहे त्या विकासाचा या समाजाच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर कोणता परिणाम झाला आहे हि बाब अभ्यासण्याची गरज संशोधक या नात्याने मला झाली त्यामुळे मी बहुसंख्य सुतार समाज असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक

व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम समोर येईल अशी संशोधकाला आशा वाटते.

सुतार समाजाची पार्श्वभूमी:

सुतार समाजाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे जाणून घेता येईल. या पार्श्वभूमीतून सुतार समाजाची ओळख होण्यास मदत होईल.

सुतार हा शब्द सुत्रधार या शब्दावरुन बनला अशी व्युत्पत्ती दिली जाते. ही व्युत्पत्ती ठीक वाटते. कारण लाकडावर काम करत असतांना सुत्राने (सुताने) मापे घेत खुणा कराव्या लागत असत. मग ओबडधोबड अशा लाकडापासुन कलाकृती जन्म घेत. भारतातील अनेक प्राचीन काष्टशिल्पे कलेचे अजोड नमुने मानले जातात.

सुतार समाजाची अध्यात्मिकता:

कर्नाटकातील शिरसिंगी हे सुतार समाजाचे पवित्र ठिकाण मानले जाते व चैत्र अमावस्येला सर्व सुतार बांधव दर्शनासाठी जात असतात. आज सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजाचे हे संस्कार सगळीकडे सारखेच पहावयास मिळतात.

सातारा जिल्ह्यातील दिक्षित क्षीरसागर हे आडनावे पहायला मिळतात. तर कोल्हापूर भागात महामुनी वेदपाठक या आडनावाची समाज आहे. कर्नाटकात बडिगेर आडनाव असणारा समाज आहे बडिगेर म्हणजे कानडी सुतार.

सुतार समाजाचे दैवत:

सुतार समाजाचे आराध्य दैवत भगवान प्रभू श्री विश्वकर्मा हे आहेत. भगवान विश्वकर्मा देवांचे वास्तुकला तज्ञ आहेत. त्यांनी भगवान श्रीकृष्णासाठी द्वारका,पांडवासाठी हस्तिनापूर व रावणासाठी सोन्याची लंका तयार केली. या नगरांच्या रचनेत, सौंदर्य, अचुकता व सुखसोयी यांचा मिलाप होता. ते वास्तुशास्त्राचे पहिले प्रणेते आहेत.

देवता महापुरुष भगवान विश्वकर्मा यांचे मंदिर नाशिक त्र्यंबकेश्वर येथे आहे, येथे विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते,येथे राहण्यासाठी सुतार समाज धर्मशाळा ट्रस्ट आहे, येथे नारायण नागबळी,काळसर्प शांती करण्यासाठी जी लोकं येतात त्यांच्या राहण्याची येथे सोय केली जाते.संत निवृत्तीनाथांच्या समाधी मंदिराजवळ आहे धर्मशाळा. येथेच विश्वकर्मा मंदिर आहे, सुतार बांधव येथे एकत्र येऊन विश्वकर्मा जयंती साजरी करतात. सुतार समाजाची कुलदेवी श्री कालीका माता आहे,व तिचे मंदिर कनकशिळ, तालुका दौलताबाद, जिल्हा संभाजीनगर येथे आहे.

वारकरी संप्रदाय व सुतार समाजातील संत मंडळी:

मराठा समाजात संत तुकाराम, माळी समाजात संत सावता माळी, धनगर समाजात संत बाळू मामा, न्हावी समाजात संत सेना महाराज, शिंपी समाजात संत नामदेव, बंजारा समाजात संत सेवालाल महाराज याप्रमाणेच सुतार समाजात सुद्धा संत भोजलिंग काका सुतार, जळोजी मळोजी हे वारकरी सुतार बंधू होवून गेले. सुतार समाज हा वारकरी संप्रदायाचा पाईक आहे. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई यांच्या वैचारिक शिकवणूकीवर विश्वास ठेवून प्रपंच चालवणारा आहे. पंढरीचा पांडुरंग हे या समाजाचे श्रद्धास्थान आहे.

संशोधनाची गरज:

संशोधकाला खालील कारणास्तव संशोधन करणे गरजेचे वाटते. प्रस्तुत संशोधनातून सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा शोध घेतला जाणार आहे. त्यामुळे यातून सुतार समाजाची शैक्षणिक परिस्थिती समोर येण्यास मदत होईल. सुतार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाची स्थिती जाणून घेता येईल. सुतार समाजाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव इतर समाज घटक व शासनाला होईल. सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यावर झालेला परिणाम अभ्यासातून समोर आणणे गरजेचे आहे.

एकंदरीत वरील सर्व बाजूने सारासार विचार केला असता समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून सहअस्तित्वात असलेल्या सुतार समाजाला संपूर्ण समाजाच्या विकासाच्या प्रवाहासोबत घेवून जाणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाची गरज संशोधकास निर्माण झाली आहे.

संशोधनाचे महत्त्व :

कोणतेही संशोधन संशोधनासाठी विषयाचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. त्यानुसारच संशोधक संशोधन करीत असतो. म्हणून संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा शोध घेता येईल.

२) सुतार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाची स्थिती जाणून घेता येईल.

३) सुतार समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा शोध घेता येईल.

४) सुतार समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा शोध घेता येईल.

५) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायावर झालेल्या परिणामांचा आढावा घेता येईल.

६) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या सामाजिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेता येईल.

७) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेता येईल.

८) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायावर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविता येतील.

९) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या सामाजिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविता येतील.

१०) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविता येतील.

समस्या विधान:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम.

कार्यात्मक व्याख्या :

संशोधन प्रक्रियेमध्ये संशोधकाला संशोधन कार्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, म्हणून अगोदरच सर्व शब्दाच्या व्याख्या कार्यात्मक स्वरूपामध्ये मांडाव्या लागतात त्यामुळे संशोधन प्रक्रियेमधील अडथळे दूर करता येतात.

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड :

मराठवाड्यातील नांदेड येथील उच्च शिक्षण देणारे विद्यापीठ ज्या अंतर्गत सुतार समाजातील विद्यार्थी शिक्षण घेतात.

२) कार्यक्षेत्र:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर हि चार जिल्हे ज्या अंतर्गत सुतार समाजातील विद्यार्थी शिक्षण घेतात असे कार्यक्षेत्र होय.

३) सुतार समाज :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार जातीत जन्माला आलेले समाजातील स्त्री व पुरुष हा सुतार समाज होय.

संदर्भ: https://mr.quora.com

४) शैक्षणिक विकास:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार समाजाने शिक्षणात केलेली प्रगती व संपादणूक म्हणजे शैक्षणिक विकास होय.

५) पारंपारिक व्यवसाय:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार समाजाचा लाकडी वस्तू बनविणे किंवा आधुनिक बदल लक्ष्यात घेवून लाकडाला पर्यायी फर्निचर बनवणारा या समाजाचा पारंपारिक व्यवसाय होय.

६) सामाजिक परिस्थिती :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार समाजाचा आदर, सन्मान, गृहीत योग्यता, सामाजिक पुढाकार, राहणीमान हि त्यांची सामाजिक परिस्थिती होय.

संदर्भ: विकिपीडिया https://en.wikipedia.org/wiki/Social_status

७) आर्थिक परिस्थिती :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार समाजाचे अर्थ उत्पादन, साधने, आर्थिक परिस्थितीनुसार स्तर हि त्यांची आर्थिक परिस्थिती होय.

संदर्भ: https://en.wikipedia.org/wiki/Socioeconomic_status

८) परिणाम:

एखाद्या गोष्टीचे फळ म्हणून होणारी किंवा मिळणारी दुसरी गोष्ट असा याचा अर्थ होतो. पर्यायी शब्द परिणिती, प्रतिफळ, फळ, फलित.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणारे नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम होय.

संदर्भ: अमरकोश, https://मराठी भारत.

संशोधनाची उदिष्टे:

संशोधन कार्याची प्रभावी यशस्वीता ही अचूक व प्रभावी संशोधनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे नियोजित केली आहेत.

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा शोध घेणे.

२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाची स्थिती जाणून घेणे.

३) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा शोध घेणे.

४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा शोध घेणे.

५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायावर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या सामाजिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

७) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

८) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायावर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविणे.

९) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या सामाजिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविणे.

१०) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांवर उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहीतके:

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाने त्यांच्या पारंपारिक व्यवसायात सकारात्मक बदल घडवले आहेत. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

२) शिक्षणाने सुतार समाजाला पारंपरिक कामांशिवाय इतर रोजगाराचे मार्ग खुले झाले, ज्यामुळे त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारली आहे. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

३) पूर्वी सुतार समाज फक्त लाकडी वस्तू बनवण्यावर अवलंबून होता. शिक्षणामुळे त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्ये प्राप्त झाली, ज्यामुळे त्यांनी लाकडी वस्तूंव्यतिरिक्त इतर व्यवसाय देखील सुरू केले. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

४) शिक्षणाने सुतार समाजाला चांगले रोजगाराचे मार्ग उपलब्ध केले. काहीजण सरकारी नोकऱ्यांमध्ये तर काहीजण खासगी कंपन्यांमध्ये काम करू लागले. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

५) शिक्षणामुळे सुतार समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत झाली. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी सामाजिक समस्यांवर आवाज उठवला. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाचा पारंपारिक व्यवसाय संपुष्टात आला आहे.- सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

७) काही सुतार कुटुंबांनी शिक्षणानंतर बांधकाम व्यवसाय, फर्निचर डिझाइन किंवा अन्य संबंधित क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे -.सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

८) काही सुतार शिक्षणानंतर सरकारी नोकऱ्यांमध्ये काम करतात, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे- . सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

९) शिक्षणामुळे सुतार समाजातील महिलासुद्धा आता शिक्षण घेत आहेत आणि विविध क्षेत्रात काम करत आहेत, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मोठा बदल झाला आहे. -सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

१०) शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे .शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगार मिळण्यास मदत झाली आहे -. सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

११) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाने त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. शिक्षणामुळे त्यांच्या पारंपारिक व्यवसायात सुधारणा झाली आहे, त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे आणि त्यांची आर्थिक स्थितीही सुधारली आहे. हे बदल त्यांच्या जीवनात एक नवीन दिशा आणि संधी निर्माण करत आहेत -.सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

संशोधनाची परिकल्पना:

सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने संशोधन परिकल्पनेचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधन परिकल्पना:

१) सुतार समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यांच्या सामाजिक विकासासाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना आणि उपायांची गरज आहे.

२) सुतार समाज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेला आहे.

३) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजातील अनेक लोक लाकडी वस्तू बनवतात, जसे की दरवाजे, फर्निचर, इत्यादी.

४) सुतार समाजातील लोकांना आर्थिक अडचणी येतात, विशेषतः पारंपरिक व्यवसाय बदलत्या स्थितीत किंवा पारंपारिक व्यवसाय संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

५) सुतार समाजातील लोकांना शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रम उपलब्ध करणे, जेणेकरून ते आधुनिक व्यवसायात सहभागी होऊ शकतील.

६) सुतार समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकार विविध योजना राबवते, त्या योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे.

७) विविध सुतार समाजातील लोकांना एकत्र आणून सामाजिक समस्यांवर काम करणे, ज्यामुळे समाजाला सक्षम करता येईल.

८) शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांनी नवीन व्यवसाय सुरू केले आहेत, ज्यामुळे त्यांची आर्थिक सुरक्षितता वाढली आहे.

संशोधनाची व्याप्ती:

१. आशय व्याप्ती:

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायसामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम , यापुरती व्यापक आहे.

२. क्षेत्र व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड , लातूर या जिल्ह्यापुरते ,हिंगोली ,परभणीव्यापक आहे.

३. काल व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर – २०२४ ते डिसेंबर – २०२७ या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा:

१. आशय मर्यादा:

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसायसामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम , एवढ्या पुरते मर्यादित आहे.

२. क्षेत्र मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड , लातूर या जिल्ह्यापुरते ,हिंगोली ,परभणीमर्यादित आहे.

३. काल मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर – २०२४ ते डिसेंबर – २०२७ या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

परिमर्यादा:

१. प्रस्तुत संशोधनात केवळ सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा अभ्यास करण्यात येणार आहे.
२. प्रस्तुत संशोधनात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड , लातूर या जिल्ह्या ,हिंगोली ,परभणीतील शहरी व ग्रामीण भागातील सुतार समाजाचा अभ्यास केला जाणार आहे.

शैक्षणिक संशोधनाची पद्धती:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने प्रस्तुत समस्या हि वर्तमानकालीन असल्याने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्याचे नियोजित केले आहे. कारण प्रस्तुत संशोधन विषयाच्यादृष्टीने सर्वेक्षण संशोधन पद्धती अभ्यासासाठी संशोधकाला समर्पक वाटते.

संशोधनाची जनसंख्या:

जनसंख्या म्हणजे संशोधक संशोधन ज्या गटावर ज्या गटावर लोकसंख्येवर करणार आहे असा गट म्हणजे जनसंख्या होय. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील

नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्ह्यातील सुतार समाज हा प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या असेल.

संशोधनाचा नमुना/न्यादर्श:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पद्धतीच्या सहेतुक निवड पद्धतीने नमुना निवड करण्याचे निश्चित केले आहे. संशोधक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्ह्यातील ४०० कुटुंब न्यादर्श म्हणून निवडणार आहे. यामध्ये नांदेड – १५०, लातूर – १००, परभणी – १०० आणि हिंगोली – ५० कुटुंब निवडणार आहे.

संशोधनाची माहिती संकलनाची साधने:

संशोधन कार्याचे निष्कर्ष अचूक येण्यासाठी संशोधनाचे विश्लेषण करणारी माहिती संकलनाची साधने ही अचूक वस्तूनिष्ठ असली पाहिजेत तेव्हाच संशोधनाचे विश्लेषण करणे व अचूक निष्कर्ष काढणे शक्य होते प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील साधनांचा समावेश केला आहे.

1) प्रश्नावली.

या साधनांचा वापर माहिती संकलनासाठी करणार आहे.

संशोधनाची सांख्यकीय साधने:

संशोधकाला माहिती संकलन केल्यानंतर त्याचे अचूक विश्लेषण करण्यासाठी काही संख्याकीय साधनांचा वापर करावा लागतो. त्यामुळे अचूक निष्कर्ष प्राप्त होण्यास अडथळा येत नाही. सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने योग्य त्या सांख्यकीय साधनांचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

निष्कर्ष व शिफारशी:

संशोधन कार्याचे यश म्हणजे संशोधकाला प्राप्त होणारे निष्कर्ष असतात ते संशोधन कार्याचे अंतिम फलित असते. प्रस्तुत संशोधन कार्याचे निष्कर्ष हे संशोधकाकडून अचूकपणे मांडले जातील.

संशोधनाची कार्यवाही:

१) संशोधन समस्या निश्चिती.

२) संशोधनकार्यासाठी न्यादर्श निश्चिती.

३) संदर्भ साधनांची निवड.

४) समस्या निगडित माहिती संकलन.

५) प्रश्नावली निर्मिती.

६) प्रतिसादकाना प्रश्नावली देणे.

७) माहिती विश्लेषण.

८) निष्कर्ष व शिफाराशी.

संशोधनाचे वेळापत्रक:

१) संशोधन समस्या निवड	डिसेंबर -२०२४
२) संशोधन आराखडा तयार करणे	
३) संबंधित साहित्यचा आढावा	जून-२०२५
४) संशोधन साधन निर्मिती	डिसेंबर -२०२६
५) माहिती संकलन करणे	जून -२०२६
६) माहिती संकलन व विश्लेषण	डिसेंबर -२०२७
७) निष्कर्ष व शिफारसी	जून -२०२८
८) अहवाल लेखन करणे	डिसेंबर-२०२८
९) सादरीकरण	डिसेंबर-२०२८

संशोधनाचे अंदाजपत्रक:

१) संशोधन समस्या निश्चिती व प्राथमिक माहिती	१०००० रू
२) क्षेत्र भेटी	४५००० रू
३) माहिती संकलन- संगणक खरेदी	८५०००रू

४) संबधित साहित्याचा आढावा- साहित्य स्टेशनरी	२५००० रू
५) माहिती विश्लेषण- ग्रंथ खरेदी	२५००० रू
६) निष्कर्ष मांडणी	२५००० रू
७) अहवाल लेखन- टंकलेखन	४५००० रू
एकूण	२६०००० रू

संदर्भ ग्रंथ सूची :

डॉ.दुनाखे, अरविंद, *उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण*, पुणे: डायमंड पब्लिकेशन.

पाटील, लीला. (१९८३). *आजचे अध्यापन*. पुणे : सुयोग प्रकाशन.

फादर, जोसेफ. व पिठेकर, एस.जे., *समुपदेशन तंत्र आणि मंत्र*.

पंडित, संजय. *मनाचे व्यवस्थापन*, मुंबई: दूर्व मेडिया पब्लिकेशन.

बापट, भा.गो. (१९९५). *शैक्षणिक संशोधन*. पुणे: नूतन प्रकाशन.

भिंताडे, वि.रा. (१९८९). *शैक्षणिक संशोधन पद्धती*. पुणे: नूतन प्रकाशन.

मुळे, रा. श., उमाठे, वि.तु. (1998). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे*. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

kothari, C.R. (2001). *Research Methodology*. New Delhi:Wishawa Prakashan.

डॉ. सौ. सप्रे, नीलिमा व प्रा.पाटील, प्रीती, (२००५) *अध्यापनाची प्रतिमाने*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

बेस्ट. जे.डब्लू ॲण्ड खान, *रिसर्च इन एज्युकेशन*, न्यु दिल्ली, प्रॅक्टीस हॉल ऑफ इंडीया पी. व्ही. टी.

मिश्रा आर., (२००५), *एज्युकेशनल रिसर्च,* पी.एच. पब्लिसिंग, कॉरपोरेशनन्यु दिल्ली.

https://nagarzp.gov.in/ssa.html

https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/English/201907251428176921.pdf

सांगूळे, संदीपान दत्तात्रय, (२०१६) पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

विकिपीडिया *https://en.wikipedia.org/wiki/Social_status*

https://mr.quora.com

अमरकोश, *https://मराठी भारत.*

https://en.wikipedia.org/wiki/Socioeconomic_status

संशोधकाचे नाव **मार्गदर्शिका**

पांचाळ नागोराव गजानन

डॉ.रामटेके वनिता देवदास
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
नांदेड, ता.जि. नांदेड